Session : 7

Date : 22/09/25

News : Jansaty

दैनिक
जनसत्य
नि:पक्ष नजर...,नि:पक्ष खबर...

# लांबोटी शाळेत सायबर सुरक्षा चर्चासत्र

**जनसत्य, प्रतिनिधी**



**मोहोळ :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लांबोटी ( चंदननगर ) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

आजमितीला अनेक प्रकारे लोकांची ऑनलाईन फसवणूक केली जात आहे. कोणीतरी फोन करतो, मी बँकेतून बोलत आहे. म्हणून विश्वासाने आपणास फसवतो. असे होऊ नये म्हणून अश्या चर्चासत्राची आवश्यकता असल्याचे मुख्याध्यापक हमीदिखाँ पठाण यांनी सांगितले. आपण ऑनलाईन फसवणूकीची शिकार होऊ नये. यासाठी कोणती काळजी घ्यावी, याविषयी आरती माळी व ऋतुजा गाडे या विद्यार्थीनींनी या विषयावर मार्गदर्शन केले. मोबाईल वर आलेला ओटीपी कोणालाही सांगू नये, अनोळखी मोबाईल नंबर वरून आलेल्या फोन कॉलची पडताळणी करून घ्यावी. व्हॉटसअप व इतर सोशल मिडियावर आलेल्या मॅसेज व लिंकची शहनिशा करूनच पुढील प्रक्रिया करावी.असे सांगितले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक हमीदिखाँ पठाण, रामचंद्र गोफणे, विजया मोरे, निर्मला रोकडे, शगुफ्ता शेख, गणेश गावडे, निलम माळी, उर्मिला साखरे, स्वाती शिंदे व विद्यार्थी उपस्थित होते.